MC 11/1/2021

व्यवस्थापन परिषदेची दिनांक ५ सप्टेंबर, २०२० रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

| बाब क्र. | बाब, ठराव आणि कार्यवाही | संबंधित विभाग |
|---|---|---|
| बाब १. | शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील अंतिम सत्र/वर्षाच्या नियमित आणि पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांची परिक्षा घेणेबाबत. | परिक्षा व मुल्यमापन मंडळ |
| ठराव | १) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील अंतिम सत्र/वर्षाच्या नियमित आणि पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांची परिक्षा घेणे संदर्भात परिक्षा व मुल्यमापन मंडळ व विद्वत परिषदेच्या दिनांक ५ सप्टेंबर, २०२० रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र. ५.१ अन्वये पारित करण्यात आलेल्या शिफारशी मंजुर करण्यात आल्या.<br><br>२) परिक्षेसंदर्भात काही तातडीची बाब निर्माण झाल्यास त्या बाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले.<br><br>३) परिक्षा घेण्यासाठी तंत्रज्ञान प्रदाता निवडण्याकरिता त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. सदर समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले.<br><br>४) कुलगुरु, प्र-कुलगुरु व कुलसचिव यांना तांत्रिक मदत मिळावी म्हणून तीन व्ही. सी. फेलो यांची ठराविक कालावधीकरिता नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आली. | -<br><br><br><br>-<br>आस्थापना १/३ |
| परिक्षा व मुल्यमापन मंडळ ह्या विभागाने केलेली कार्यवाही | ठरावानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील अंतिम सत्र/ वर्षाच्या नियमित आणि पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात आलेल्या असून सदर परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. | |
| आस्थापना १/३ विभागाने केलेली कार्यवाही | सदर बाबत झालेल्या ठरावानुसार विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमधून व्ही.सी. फेलो नियुक्त करण्यासंदर्भात दि. २२/१२/२०२० रोजी No. HRDC/ICD/2020-21/939 नुसार परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. | |

मुंबई - ४०० ०३२
११ जानेवारी, २०२१

प्र. कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)